मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापौर पदासाठी गुरुवारी आरक्षण सोडत..!

## राज्यभरातील 29 महानगरपालिकांचे आरक्षण एकाचवेळी जाहीर होणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदांच्या आरक्षणाची सोडत गुरुवारी, दि.२२ जानेवारी २०२६ रोजी काढण्यात येणार आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिकृत पत्रक जारी केले आहे.

राज्यमंत्री (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली ही



आरक्षण सोडत प्रक्रिया गुरुवारी दि.२२ रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालय, मुंबई येथे पार पडणार आहे. या बैठकीत राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमधील महापौर पदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे.

आगामी काळातील महापालिकांच्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीने ही आरक्षण सोडत अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, या प्रक्रियेवर राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपाने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले असून, १२८ पैकी ८४ नगरसेवक भाजपाचे निवडून आले आहेत. त्यामुळे महापौर पदासाठी कोणते आरक्षण पडणार आणि महापौरपदी कोण विराजमान होणार, याबाबत शहरात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

---

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत 'जुने-नवे' समीकरण

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपचा ऐतिहासिक विजय; पक्ष कार्यालियात जल्लोषाचा उत्साह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी अनुभव आणि नवीन उत्साह यांचा समतोल साधत १२८ पैकी निम्म्या म्हणजे ६४ जागांवर नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे, तर उर्वरित ६४ अनुभवी नगरसेवकांना पुन्हा एकदा सभागृहात स्थान मिळवून दिले आहे. पहिल्यांदाच निवडून आलेल्या या ६४ नव्या शिलेदारांमध्ये सर्वाधिक ४३ जण भारतीय जनता पक्षाचे आहेत. त्याखालोखाल राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या १७ आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाच्या ४ जणांना जनतेने पहिल्यांदाच लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली आहे.

भाजपचे सोनम मोरे, सुजाता बोराटे, निखिल बो-हाडे, सारिका गायकवाड, अर्चना सस्ते, सचिन तापकीर, श्रुती डोळस, उदय गायकवाड, कृष्णा सुरकुले, कविता भोंगाळे, रेखा देवकर, राजश्री लांडगे, योगेश लांडगे, राणी पठारे, सुहास कांबळे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, रिटा सानप, नीलेश नेवाळे, शितल वर्णेकर, शिवानी नरळे, अनिल घोलप, अर्चना करांडे, कैलास कुटे, धर्मपाल तंतरपाळे, पल्लवी वाल्हेकर, मनिषा चिंचवडे, मधुरा शिंदे, मंदार देशपांडे, कोमल काळे, तानाजी बारणे, कुणाल वाव्हळकर, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, स्नेहा कलाटे, अर्चना तापकीर, अनिता काटे, कुंदा भिसे, रविना आगोळकर, श्याम जगताप, ज्ञानेश्वर जगताप, पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे विकास साने, यश साने, विराज लांडे, अश्विनी वाबळे, तुषार सहाने,



सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासुळकर, अरूणा लंगोटे, शेखर चिंचवडे, मनिषा लांडे, वर्षा जगताप, प्रियांका कुदळे, सागर कोकणे, योगिता बारणे, प्रतिक्षा लांघी, दिप्ती कांबळे, उज्जवला ढोरे आणि शिवसेना शिंदे गटाचे ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे, नीलेश तरस, विश्वजीत बारणे यांना पहिल्यांदाच नगरसेवक होण्याची संधी मिळाली.

**या ६४ माजी नगरसेवकांचा पुन्हा प्रवेश**

संगिता ताम्हाणे, सारिका बोराडे, हिराबाई घुले, भिमाबाई फुगे, सागर गवळी, जालिंदर शिंदे, रवि लांडगे, सोनाली गव्हाणे,नम्रता लोंढे,अनुराधा गोरखे, तुषार हिंगे, कुंदन गायकवाड, योगिता नागरगोजे, प्रविण भालेकर, पंकज भालेकर, प्रमोद कुटे,शैलजा मोरे, शर्मिला बाबर, अमित गावडे, आशा सुर्यवंशी,संदिप कस्पटे, बाबा त्रिभुवन, सविता खुळे,अनंत को-हाळे, सुरेश भोईर,निकिता कदम, संदीप वाघेरे,मनिषा पवार, अभिषेक बारणे, राहुल कलाटे, विनायक गायकवाड, शशिकांत कदम, राजू बनसोडे, हर्षल ढोरे,उत्तम केंदळे, जितेंद्र ननावरे,संजय काटे,सविता आसवाणी हे दोनवेळा निवडून आले आहेत.

नितीन लांडगे, राहुल जाधव, नितीन काळजे, वैशाली घोडेकर, राहूल भोसले, वैशाली काळभोर, शरद मिसाळ, शितल शिंदे, संतोष कोकणे, माया बारणे, निलेश बारणे,आरती चोंधे, शत्रुघ्न काटे, विठ्ठल काटे, शकुंतला धराडे,, स्वाती काटे, नवनाथ जगताप,डब्बू आसवाणी, निता पाडाळे, विनोद नढे यांची तिसरी टर्म आहे. सुलभा उबाळे, अपर्णा डोके, भाऊसाहेब भोईर,प्रशांत शितोळे हे चारवेळा आणि योगेश बहल हे सलग सातव्यादा निवडून आले आहेत. या 64 माजी नगरसेवकांनी मतदारांनी पुन्हा एकदा संधी दिली आहे.

### 27 माजी नगरसेवकांचा पराभव

**महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत विजयी झालेल्या २७ नगरसेवकांचा पराभव झाला. त्यामध्ये अश्विनी जाधव, वसंत बोराटे, अनुराधा गोफणे, प्रियांका बारसे, संतोष लोंढे, सीमा सावळे, विलास मडिगेरी, सचिन चिखले, मीनल यादव, मोरेश्वर भोंडवे, नामदेव ढाके, सचिन चिंचवडे, अश्विनी चिंचवडे, मोरेश्वर शेडगे, जयश्री गावडे, सुजाता पालांडे, सुलक्षणा धर, उषा वाघेरे, उषा काळे, मयुर कलाटे, रेखा दर्शिले, तुषार कामठे, चंद्रकांत नखाते, शितल काटे, उषा मुंढे, रोहित काटे, उषा ढोरे या २७ माजी नगरसेवकांना पराभवाची चव चाखण्याची वेळ आली.**

# पिंपरीतील 19 प्रभागात 'क्रॉस वोटिंग'

## निवडणुकीत 19 प्रभागात क्रॉस वोटिंगमुळे अनेक दिग्गजांचा पराभव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत १९ प्रभागात क्रॉस वोटिंगमुळे अनेक दिग्गजांचा पराभव झाला. अनेक प्रभागांमध्ये तीन, दोन किंवा एका जागी अन्य पक्षाचा उमेदवार निवडून आला आहे. सर्वच पक्षातील नाराजांनी क्रॉस वोटिंग केल्याने माजी नगरसेवकांचे धक्कादायक निकाल लागले. यामुळे माजी महापौरांसह, तीन स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांना पराभवाला सामोरे जावे लागले.




राज्यातील सत्तेत एकत्र असलेल्या महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने महापालिकेची स्वतंत्र निवडणूक लढविली. या प्रमुख दोन पक्षांच्या उमेदवारांमध्येच निवडणूक झाली. यामध्ये भाजपला सर्वाधिक ८४, राष्ट्रवादी काँग्रेसला ३७, शिवसेना (शिंदे) पक्षाला सहा आणि एक अपक्ष असे १२८ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात माजी नगरसेवकांची फोडाफोडी झाली. त्यानंतर उमेदवारी जाहीर न करताच अर्ज भरण्यात आले. चार सदस्यीय प्रभागात काही ठिकाणी चार उमेदवारांनी एकत्र प्रचार केला. मात्र, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही उमेदवारांनी 'पॅनेल टू पॅनेल' प्रचार केला नाही. पक्षाच्या नेत्यांकडूनही स्थानिक नेते, पॅनेलप्रमुख आणि उमेदवारांना हातमिळवणी करू नका, पॅनेल विजयी झाला पाहिजे, असा सज्जड दम सभांमधून दिला. मात्र, त्यानंतरही उमेदवारांनी भावकी-गावकी पाहून मतदान करण्याचे आवाहन केले. त्यामुळेच ३२ पैकी १९ प्रभागात क्रॉस वोटिंग झाले असून पॅनेल विजयी झाले नसल्याचे चित्र आहे.

भाजपचे २, ३, ४, ६, १०, ११, १५, २५, २६ आणि २९ या दहा प्रभागात संपूर्ण पॅनेल विजयी झाले तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्रमांक ९, २० आणि २१ या तीन प्रभागात पूर्ण पॅनेल विजयी झाले आहे. प्रभाग क्रमांक १, ५, ७, ८, १२,१३,१४, १६, १७, १८,१९, २२, २३, २४, २७, २८, ३०, ३१ आणि ३२ या एकूण १९ प्रभागात क्रॉस वोटिंग झाले. त्यामुळे माजी महापौर उषा ढोरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी, संतोष लोंढे, सीमा सावळे, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, चंद्रकांत नखाते, जयश्री गावडे, मोरेश्वर शेंडगे, सिध्देश्वर बारणे, रोहित काटे या माजी नगरसेवकांना पराभवाला सामोरे जावे जागले. त्यांना क्रॉस वोटिंगचा फटका बसला आहे.

### पॅनेल भेदून मिळविली विजयश्री

» अनेक प्रभागात चारपैकी पॅनेलचे तीन जण विजयी झाले. परंतु, एका जागेवर पराभव झाला. त्या जागेवर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी आपल्या ताकदीच्या जोरावर विजय खेचून घेतला. त्यामध्ये भाजपचे संजय काटे, कैलास कुटे, सोनम मोरे, धर्मपाल तंतरपाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे, पंकज भालेकर, अनंत कोऱ्हाळे, सविता आसवानी, भीमाबाई फुगे, संतोष कोकणे, सागर कोकणे, विराज लांडे, तुषार सहाणे, योगिता बारणे, दिप्ती कांबळे, उज्वला ढोरे, शिवसेना (शिंदे) पक्षाच्या सुलभा उबाळे यांनी पॅनेलमधील एकट्याने विजय मिळविला.

### क्रॉस वोटिंगची चित्रफित प्रसारीत

» महापालिकेच्या प्रभाग ३२ सांगवीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयी उमेदवार उज्वला ढोरे यांचा प्रचारादरम्यानची क्रॉस वोटिंगची चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाली आहे. 'एक मत घड्याळाला द्या आणि उर्वरित तीन मते तुमचे तुम्ही भाजपला करा' असे आवाहन त्या महिला कार्यकर्त्यांना करित असल्याचे चित्रफीतून दिसत आहे. मात्र, त्यांनी हा आरोप फेटाळला असून सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा जमाना असून अशा चित्रफित प्रसारित होतात, असे ढोरे यांनी म्हटले आहे.

# शहर देशात प्रथम क्रमांकाने ओळखले जाईल असे काम करू! शत्रुघ्न काटे

## महापालिका निवडणुकीत महाविजय : भारतीय जनता पार्टीच्या पत्रकार परिषदेत ग्वाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगातील तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत आहे. सन २०४७ मध्ये देशाचा १०० वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना आपला देश विकसित भारत देश म्हणून जगभर ओळखला जावा, यासाठी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार काम करीत आहे. मतदारांच्या विश्वासास पात्र ठरून पिंपरी चिंचवड शहर देशात प्रथम क्रमांकाने ओळखले जाईल. यासाठी सर्व आमदार, खासदार, नगरसेवक, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते यांना विश्वासात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने आगामी काळात काम करू अशी ग्वाही भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली.



महापालिका निवडणुकीत महाविजय प्राप्त केल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्यावतीने पत्रकार परिषद घेण्यात आली.


शत्रुघ्न काटे म्हणाले की, वेगाने विकसित होणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. यामध्ये सर्वच बाजूने पिंपरी चिंचवड शहराचे देखील मोठे योगदान आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ते केंद्र सरकारपर्यंत एकाच विचाराचे सरकार असल्यास शहराचा आणि राज्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने विकास करता येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सभापती राम शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, पंकजाताई मुंडे, आमदार महेशदादा लांडगे, शंकर जगताप, उमाताई खापरे, अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले या मान्यवरांनी निवडणूक काळात शहरामध्ये प्रचार सभा गाजवल्या. त्यामुळे १५ जानेवारी रोजी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मतदारांनी एक हाती सत्ता देऊन विश्वास व्यक्त केला आहे.

**मतदारांचा भाजपावर विश्वास...**

यावेळी शत्रुघ्न काटे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शहरातील नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन शहराध्यक्ष तथा आमदार लक्ष्मण भाऊ जगताप, आमदार महेश दादा लांडगे, माजी खासदार अमर साबळे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड मनपा मध्ये भाजपाला बहुमत दिले. त्यानंतरच्या काळात झालेल्या विकास कामांमुळे मतदारांनी भाजपावर विश्वास व्यक्त केला आहे. आता मेट्रोचे विस्तारीकरण, वाहतूक व्यवस्थेत सुधारणा, नियमित पाणीपुरवठा, नदी सुधार योजना, आरोग्य, वैद्यकीय, शिक्षण, कला, क्रीडा, महिला सुरक्षा, कायदा सुव्यवस्था, पर्यावरण अशा सर्व क्षेत्रांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशात प्रथम क्रमांकाने ओळखली जावी यासाठी नियोजन केले जाईल असे शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

# स्पर्धेचा मार्ग सकाळी खुला ठेवल्याने नोकरदारांचा त्रास कमी

## नंतर मात्र जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता परिसरातील गल्ली बोळात वाहने लावून अनेक जण कामावर पोहोचले.



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६' अंतर्गत आज आयोजित करण्यात आलेल्या प्रोलॉग सायकल स्पर्धेच्या निमित्ताने सोमवारी नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन रस्ता), जंगली महाराज रस्त्यासह मध्य भागातील प्रमुख ऱस्ते, उपरस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात आले आहेत. जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता परिसरातील गल्ली बोळात वाहने लावून अनेक जण कामावर पोहोचले. पोलिसांनी या भागातील वाहतूक टप्याटप्याने बंद केल्याने व्यावसायिक, नोकरदार कार्यालयात पोहोचू शकले.

पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६' अंतर्गत आयोजित आजच्या प्रोलॉग सायकल स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धा सुरळीत पार पाडणे, तसेच वाहतूक नियोजनाच्या अनुषंगाने स्पर्धेच्या मार्गावर दीड हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्त्यावरील वाहतूक सकाळी ११ पर्यंत सुरू होती. झाशीची राणी चौकातून जंगली महाराज रस्त्याकडे जाणारा मार्ग बालगंधर्व रंगमंदिराजवळ बंद करण्यात आला. त्यामुळे वाहनचालक शिवाजीनगर गावठाण परिसरातून जंगली महाराज रस्त्यावर आले. तेथील गल्ली बोळात वाहने लावून व्यावसायिक, नोकरदार कार्यालयापर्यंत पोहोचू शकले. जंगली महाराज रस्ता सकाळी साडेदहापर्यंत खुला ठेवण्यात आला होता. त्यामुळे डेक्कन जिमखाना, जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता परिसरातील कार्यालयात काम करणाऱ्या नोकरदार, व्यावसायिकांची पायपीट वाचली. जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता भागातील उपाहारगृहे सुरू होते. मात्र, दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

'सकाळी कामावर जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून वाहतूक पोलिसांनी जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्त्यासह उपरस्ते सकाळी साडेदहा ते अकरा वाजेपर्यंत वाहतुकीसाठी खुले ठेवले होते. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना वाहतूक बदलाची माहिती दिली,' अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली. त्यामुळे नोकरदार, व्यावसायिक कामावर वेळेत पोहोचू शकले.

प्रोलॉग सायकल स्पर्धेच्या निमित्ताने सोमवारी नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन रस्ता), जंगली महाराज रस्त्यासह मध्य भागातील प्रमुख ऱस्ते, उपरस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात आले आहेत. जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता परिसरातील गल्ली बोळात वाहने लावून अनेक जण कामावर पोहोचले.

### दीड हजार पोलीस कर्मचारी बंदोबस्तास तैनात

**» वाहतूक नियोजनाच्या अनुषंगाने स्पर्धेच्या मार्गावर दीड हजार पोलीस तैनात आहेत.पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. चार अतिरिक्त पोलीस आयुक्त, दहा पोलीस आयुक्त, वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दीड हजार पोलीस कर्मचारी बंदोबस्तास तैनात करण्यात आला आहे. स्पर्धेच्या मार्गावर गुन्हे शाखा, विशेष शाखेतील पथके तैनात राहणार आहेत. बॉम्बशोधक नाशक पथक (बीडीडीएस), शीघ्र कृती दल (क्विक रिस्पॉन्स टीम), सर्वेलन्स व्हेईकल 'दृष्टी' अशी पथके तैनात आहेत.**

### पीएमपी सेवा पर्यायी मार्गाने

**» जंगली महाराज रस्ता परिसरातून स्वारगेटकडे जाणारी पीएमपी बससेवा छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरून वळविण्यात आली होती. टिळक रस्ता, शास्त्री रस्ता, विधी महाविद्यालय रस्ता परिसरातून वाहतूक वळविण्यात आली. वाहतूक बदलामुळे अनेक जण मेट्रोने जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता परिसरात अले.**

### सकाळी वाहतुकीसाठी रस्ते खुले ठेवले

**» 'सकाळी कामावर जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून वाहतूक पोलिसांनी जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्त्यासह उपरस्ते सकाळी साडेदहा ते अकरा वाजेपर्यंत वाहतुकीसाठी खुले ठेवले होते. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना वाहतूक बदलाची माहिती दिली,' अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली. त्यामुळे नोकरदार, व्यावसायिक कामावर वेळेत पोहोचू शकले.**

# पुणे विद्यापीठात 'नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस'चे दिमाखात उद्घाटन

## गणेशखिंड पोस्ट ऑफिसमधून तंत्रज्ञानाधारित, नागरिक-केंद्रित टपाल सेवांचा नवा अध्याय सुरू



**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील गणेशखिंड पोस्ट ऑफिस येथे नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसचे उद्घाटन शनिवारी (दि.17) मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यापीठ परिसरात आधुनिक, तंत्रज्ञानाधारित व नागरिक-केंद्रित सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या प्रगत व नवोन्मेषी वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.

या उद्घाटन समारंभास राज्यसभेच्या खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी, महाराष्ट्र व गोवा सर्कलचे चीफ पोस्टमास्तर जनरल श्री. अमिताभ सिंग, पुणे क्षेत्राचे डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस श्री. अभिजित बनसोडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस अभिजित बनसोडे यांनी आपल्या भाषणात पोस्ट ऑफिसची आवश्यकता आणि त्यामागील रोडमॅप सविस्तरपणे स्पष्ट केला. या वेळी डॉ. विजय खरे यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा सक्रिय वापर करून त्याचा शैक्षणिक व वैयक्तिक जीवनात उपयोग करून घ्यावा, असे सांगितले.

या वेळी डॉ. मेधा कुलकर्णी यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस या संकल्पनेचे कौतुक करत टपाल विभाग आधुनिक व हायटेक होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. चीफ पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग यांनी, पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून जुना भारत आणि नवा भारत यांचा सुंदर संगम साधला जात असल्याचे सांगितले. विद्यापीठ परिसरात आधुनिक, तंत्रज्ञानाधारित व नागरिक-केंद्रित सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या प्रगत व नवोन्मेषी वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.

### नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा वापर

**» डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस अभिजित बनसोडे यांनी आपल्या भाषणात पोस्ट ऑफिसची आवश्यकता आणि त्यामागील रोडमॅप सविस्तरपणे स्पष्ट केला. या वेळी डॉ. विजय खरे यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा सक्रिय वापर करून त्याचा शैक्षणिक व वैयक्तिक जीवनात उपयोग करून घ्यावा, असे सांगितले.**

# विद्याधाम प्रशाला शिरूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

## शिरूर येथे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर कायदेविषयक जागरूकताही तितकीच आवश्यक असल्याच्या उद्देशाने विद्याधाम प्रशाला, शिरूर येथे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराला घोडनदी न्यायालयाचे माननीय न्यायाधीश डी. बी. डोमाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना कायदा, न्यायव्यवस्था व सामाजिक जबाबदाऱ्या यांची ओळख करून देण्यात आली. घोडनदी वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. उदय सरोदे यांनी कायदेविषयक जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थीदशेतच योग्य-अयोग्याची जाणीव निर्माण झाली तर समाज अधिक सक्षम होतो, असे प्रतिपादन केले. अॅड. वीरेंद्र सावंत यांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत सविस्तर माहिती देत बालविवाहाचे सामाजिक, मानसिक व कायदेशीर दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडले.

अॅड. साहेबराव जाधव यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर तरतुदी व त्यातून होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते व भवितव्य धोक्यात येते, त्यामुळे अशा प्रवृत्तींपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. अॅड. सारिका बर्डे यांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित करताना व्यसनांमुळे होणारे आरोग्यविषयक, कौटुंबिक व कायदेशीर नुकसान स्पष्ट केले. अॅड. वैशाली धोंगडे यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर जबाबदाऱ्या, हक्क व कर्तव्ये यांची माहिती देत सजग नागरिक होण्याचा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून स्वतःसह समाजालाही योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक पाचारणे सर व देविकर सर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती केवळ ऐकून न थांबता ती आचरणात आणावी, तसेच कायद्याचे पालन करून आदर्श नागरिक बनावे, असे




### विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढण्यास मदत

» विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून स्वतःसह समाजालाही योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक पाचारणे सर व देविकर सर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती केवळ ऐकून न थांबता ती आचरणात आणावी, तसेच कायद्याचे पालन करून आदर्श नागरिक बनावे, असे सांगितले.या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व जिज्ञासा दिसून आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली असून भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन अधिक प्रमाणात व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### सजग नागरिक होण्याचा संदेश

» अॅड. साहेबराव जाधव यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर तरतुदी व त्यातून होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते व भवितव्य धोक्यात येते, त्यामुळे अशा प्रवृत्तींपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. अॅड. सारिका बर्डे यांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित करताना व्यसनांमुळे होणारे आरोग्यविषयक, कौटुंबिक व कायदेशीर नुकसान स्पष्ट केले. अॅड. वैशाली धोंगडे यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर जबाबदाऱ्या, हक्क व कर्तव्ये यांची माहिती देत सजग नागरिक होण्याचा संदेश दिला.

### शंकांचे निरसन

» यावेळी अॅड. विशाल शेंडगे, अॅड. विवेक खांडरे, अॅड. कविता कर्डिले, नीता निंबाळकर, ऋषिकेश बोराडे व लिपिक बोंदर्डे यांनीही विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे देत त्यांना योग्य दिशा दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश डी. बी. डोमाळे यांनी कायदा म्हणजे केवळ शिक्षा देणारी यंत्रणा नसून समाजाला योग्य मार्गावर नेणारे साधन आहे, असे सांगितले.

# आळंदीत प्रवाशांची दीड किलोमीटर पायपीट! बस स्थानक हलवलं पण सोयीसुविधा वाऱ्यावर

## पंधरा दिवसांपासून भाविकांचा संघर्ष; प्रशासनाच्या नियोजनशून्य विस्तारामुळे तीर्थक्षेत्राच्या मुख्य भागात जाण्यासाठी भाविकांना कसरत.

**पुणे | प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र आळंदी येथील पीएमपीएमएल बस स्थानकाचे पंधरा दिवसांपूर्वी विस्तारीकरण करून ते दोन वेगवेगळ्या ठिकाणी विभागण्यात आले आहे. या प्रक्रियेत पुणे विभागातून येणाऱ्या बसेस आळंदी देहू फाटा वाय जंक्शन येथील मोकळ्या जागेत हलवण्यात आल्या आहेत. मात्र, या नवीन ठिकाणी प्रवाशांसाठी कसल्याही प्रकारच्या निवाऱ्याची अथवा प्रकाशाची सोय करण्यात आलेली नाही.

यामुळे हडपसर, शेवाळेवाडी, खराडी, कात्रज, स्वारगेट, पुणे स्टेशन आणि कोथरूड यांसारख्या विविध भागांतून येणाऱ्या प्रवाशांना मुख्य आळंदीत जाण्यासाठी दीड किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागत आहे.राज्य परिवहन महामंडळाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात हे स्थानक सुरू करण्यात आले असून, येथे दिवसभरातून लाखो प्रवाशी प्रवास करतात. रात्रीच्या वेळी प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून लूटमारीची भीतीही व्यक्त केली जात आहे. या संदर्भात आळंदीतील ज्येष्ठ पत्र लेखक मुकुंद दिंडाळ यांनी स्वारगेट डेपोकडे लेखी स्वरूपात तक्रार करत जुन्या पुलाजवळील बस स्थानकावर या बसेस उभ्या करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.पीएमपीएमएल प्रशासनाने पुणे विभागातील बसेस नवीन स्थानकाऐवजी आळंदीतील जुन्या बस स्थानकावर उभ्या कराव्यात आणि ज्या ठिकाणी प्रवाशांची संख्या मर्यादित आहे,

अशा पिंपरी-चिंचवडकडे जाणाऱ्या बसेस नवीन स्थानकात हलवाव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी हा बदल तातडीने करणे आवश्यक असल्याचे दिंडाळ यांनी नमूद केले आहे. ज्या प्रवाशांकडे पास आहे, ते देहू फाटा किंवा काटे कॉलनी येथे उतरून पुढील प्रवास करू शकतात, असेही सुचवण्यात आले आहे.



### नागरिकांमध्ये तीव्र संताप

» या संदर्भात आळंदीतील ज्येष्ठ पत्र लेखक मुकुंद दिंडाळ यांनी स्वारगेट डेपोकडे लेखी स्वरूपात तक्रार करत जुन्या पुलाजवळील बस स्थानकावर या बसेस उभ्या करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.पीएमपीएमएल प्रशासनाने पुणे विभागातील बसेस नवीन स्थानकाऐवजी आळंदीतील जुन्या बस स्थानकावर उभ्या कराव्यात आणि ज्या ठिकाणी प्रवाशांची संख्या मर्यादित आहे,